क्र. (५)

राज्यक्रीडा संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदान

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्र. पीएचई १०८९/प्र. क्र. ३०२/क्रीयुसे-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ मार्च, १९९१

वाचा:- संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आपयो/ १०८९/४८२/का-७ दिनांक ३१-१२-१९९०

शासन निर्णय:- राष्ट्रीय स्पर्धात महाराष्ट्राचे संघ विशेषत: खो. खो., कबड्डी, बास्केटबॉल, जलतरण, बॅडमिंटन, टेबलटेनिस, फुटबॉल इत्यादी अनेक खेळात नेत्रदिपक अशी कामगिरी बजावीत असतात. परंतु त्यांच्या या कार्याचे योग्य मुल्यमापन होत नाही. राज्य संघटनांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे राज्यामध्ये त्या त्या खेळांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार करणे राज्य संघटनांना शक्य होत नाही. या गोष्टीचा साकल्याने विचार करुन शासन पुढीलप्रमाणे योजना मंजूर करीत आहेत:-

१] सांघिक खेळाकरिता राष्ट्रीय स्पर्धात सुवर्ण पदक, रौप्य पदक व कास्य पदक प्राप्त करणा-या संघाच्या संघटनांना सांचे १५,०००/-, रु. १०,०००/- व रु. ५,०००/- असे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे.

२] वैयक्तिक खेळांच्या बाबींसाठी अनुक्रमे रु. ३,०००/-, रु. २,०००/- व रु. १,०००/- इतकी रक्कम सुवर्ण, रौप्य व कास्य पदक मिळणा-या संघटनेला प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे.

या अनुदानाचा उपयोग संबंधित राज्य संघटनेने राज्यात खेळाचा विकास करण्याकरिता करणे आवश्यक आहे. उदा. जिल्हा संघटना कार्यान्वित करणे, शिबीरे आयोजित करणे, अत्याधुनिक खेळाचे साहित्य खरेदी करणे इत्यादी. या योजनेचे नियम सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे असतील.

३. या योजनेसाठी सन १९९१-९२ या आर्थिक वर्षामध्ये सांचे ३.०० लाख [रु. तीन लाख फक्त] खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. हा खर्च लेखा शिर्ष "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ-[५][बी] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [८] स्पर्धेची एकेरी खेळासाठी उत्तेजनार्थ अनुदान-राज्य पातळीवरील असोसिएशन मागणी क्र. एन-२" या खाली टाकण्यात यावा. व सन १९९०-९१ या आर्थिक वर्षामध्ये भाग-१ नवीन बाबीद्वारे मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. या योजनेकरिता संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

2091 - 31 Grant in aid

४. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २९६/९१/व्यय-११ दिनांक २७-३-१९९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ मं. ती. गोखले ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व अनुज्ञेयता] नागपूर
जिल्हा कोषाधिकारी, पुणे
विविध राज्य क्रीडा संघटना, [संचालकामार्फत]
मा. राज्यमंत्री क्रीडा यांचे स्वीय सहाय्यक,
निवड नस्ती का. क्रीयुसे-१

## प्र प त्र "अ"

शासन निर्णय : समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक-पीएचई/१०८९/प्र.क्र. ३०२/क्रीयुसे-१, दि. २७.३.९१ चे सहपत्र.

राज्यातील एकविध खेळाच्या राज्यसंघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदानाचे नियम.

.....

| | | |
|---|---|---|
| शिर्षक | नियम क्र. १ | : या नियमास "राज्यातील एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदानाचे नियम" असे संबोधण्यात यावे. |
| अंमलबजावणीची तारीख | नियम क्र. २ | : हे नियम योजनेच्या नियमास मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय ज्या तारखेपासून निर्गमित होईल त्या तारखेपासून अंमलात येतील. |
| मान्यता प्राप्त खेळाच्या संघटना | नियम क्र. ३ | : इंडियन ऑलिंपिक असोसिएशन व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनतर्फे मान्यता प्राप्त खेळांच्या राज्य संघटना प्रोत्साहनात्मक अनुदानास पात्र समजण्यात याव्यात. [संबंधीत खेळांच्या राष्ट्रीय महासंघाने विदर्भातील ज्या खेळांना राज्याचा दर्जा दिलेला आहे, त्या खेळांच्या संघटनांना राज्य संघटना म्हणून ग्राह्य समजाव्यात]. |
| अनुदान मंजूरी | नियम क्र. ४ | : अ] मान्यता प्राप्त खेळाची राज्य संघटना सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० किंवा पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदणीकृत असावी व संबंधीत खेळाच्या राष्ट्रीय महासंघास संलग्न असावी. |
| | | ब] संबंधीत खेळाच्या राज्य संघटनेस राज्यातील किमान ३/४ जिल्हा संघटना संलग्न असणे आवश्यक आहे. |
| | | क] गतवर्षी मंजूर केलेल्या प्रोत्साहनात्मक अनुदानाच्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र, लेखापरिक्षित अहवाल व विवरणपत्र व अनुदानाचे विनियोग ज्या प्रयोजनासाठी करण्यात आला असेल त्याबाबत सविस्तर अहवाल. |

...२..

अनुदानाची रक्कम नियम क्र. ५ : अ] सांघिक खेळ.

एकविध खेळाच्या राज्य संघटनेमार्फत राज्याचा संघ संबंधीत खेळाच्या राष्ट्रीय महासंघाद्वारे आयोजित अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होऊन सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक संपादन केल्यास खाली नमूद केल्यानुसार संबंधीत राज्य संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदानास पात्र समजण्यात यावेत.

| | |
|---|---|
| सुवर्ण पदक | रु. १५,०००/- |
| रौप्य पदक | रु. १०,०००/- |
| कास्य पदक | रु. ५,०००/- |

[टीप : पुरुष व महिला संघाने पदक संपादन केल्यास राज्य संघटना स्वतंत्रपणे अनुदानास पात्र समजण्यात यावी. ]

ब] वैयक्तिक खेळ.

एकविध खेळाच्या राज्य संघटनेमार्फत राज्याचा खेळाडू संबंधीत खेळाच्या राष्ट्रीय महासंघाद्वारे आयोजित अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत वैयक्तिक क्रीडा प्रकारात सहभागी होऊन एक किंवा अनेक सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक संपादन केल्यास खाली नमूद केल्यानुसार राज्य संघटना प्रोत्साहनात्मक अनुदानास पात्र समजण्यात यावेत.

एक किंवा अनेक सुवर्ण पदक रु. ३,०००/-

एक किंवा अनेक रौप्य पदक रु. २,०००/-

एक किंवा अनेक कास्य पदक रु. १,०००/-

क] वैयक्तिक क्रीडा प्रकारातील ज्या बाबीत एकापेक्षा जास्त खेळाडू सांघिकरित्या सहभागी होऊन सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक संपादन केल्यास सांघिक खेळानुसार वैयक्तिक खेळाची राज्य संघटना प्रोत्साहनात्मक अनुदानास पात्र समजण्यात यावी.

[टीप : पुरुष व महिला या दोन्ही गटातील क्रीडा प्रकारात पदक संपादन केलेल्या संघटना स्वतंत्रपणे अनुदानास पात्र समजण्यात यावी. ]

राज्य संघटनांच्या खेळास स्वतंत्र [पुरुष व महिला] खालीलप्रमाणे ९०-९१ या आर्थिक वर्षात संघटनांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येणार आहे.

१] सांघिक खेळ -

| | |
|---|---|
| सुवर्ण पदक | १५०००/- |
| रौप्य पदक | १००००/- |
| कास्य पदक | ५०००/- |

टिप :- [पुरुष व महिला संघाने पदक संपादन केल्यास राज्य संघटनांना स्वतंत्रपणे अनुदानपत्र असतील]

२] वैयक्तिक खेळ -

| | |
|---|---|
| एक किंवा अनेक सुवर्णपदक | रु. ३,०००/- |
| एक किंवा अनेक रौप्य पदक | रु. २,०००/- |
| एक किंवा अनेक कास्यपदक | रु. १,०००/- |

३] त्याचप्रमाणे वैयक्तिक क्रीडा प्रकारातील ज्या बाबतीत एकापेक्षा जास्त खेळाडू सांघिकरित्या सहभागी होऊन सुवर्ण रौप्य किंवा कास्य पदक संपादन केल्यास सांघिक खेळानुसार वैयक्तिक खेळाची राज्यसंघटना प्रोत्साहनात्मक अनुदानात पात्र समजण्यात येईल.

४] ज्या खेळांच्या स्पर्धा एकेरी व सांघिक अशा दोन्ही प्रकारे आयोजित करण्यात येतात त्या खेळांच्या राज्य संघटना वरील दोन्ही प्रकारच्या [सांघिक व वैयक्तिक] प्रोत्साहनात्मक अनुदानास पात्र समजण्यात येईल.

एकविध खेळाच्या राज्य संघटनांना देण्यात आलेले अनुदान राज्य संघटनेने खालील बाबींवर खर्च करावे.

१] संबंधित खेळाच्या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन.

२] संबंधित खेळाचे साहित्य व प्रशिक्षण साहित्य खरेदी.

उपरोक्त बाबी अनुदानासाठी खालील बाबींची पूर्तता करावी.

१] संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी.

२] रजिस्ट्रेशन नंबर

३] राष्ट्रीय महासंघास संलग्न असल्याबाबतची कागदपत्रे.